Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प रि प त्र क

५६ /२०२६

विषय - शिवाजी विद्यापीठाचा ६४ वा वर्धापन दिन निमित्त

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी, व प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, **शिवाजी विद्यापीठाचा ६४ वा वर्धापन दिन बुधवार, दि.१८ नोव्हेंबर, २०२६** रोजी साजरा होत आहे. त्या निमित्ताने सदर दिवशी **सकाळी ८.३० वाजता** विद्यापीठाच्या प्रांगणात मा. कुलगुरू, प्रा. (डॉ.) आर. के. कामत यांचे शुभहस्ते ध्वजारोहण समारंभ संपन्न होणार आहे. तसेच, वर्धापन दिन कार्यक्रम विद्यापीठातील **राजर्षी शाहू सभागृह** मध्ये आयोजित करण्यात आलेला आहे. तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक यांनी वर्धापन दिन समारंभास उपस्थित रहावे, ही विनंती.

सदर दिवशी कार्यालयीन व पदव्युत्तर विभागाची कामकाजाची वेळ **सकाळी ८.०० ते ११.३०** अशी राहील, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/ 2292
दि. 12 NOV 2026

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव, समकक्ष अधिकारी सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
२. मा. कुलगुरु, मा. प्र—कुलगुरू मा. कुलसचिव, अधीष्ठाता, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन, व मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास
३. **अभियांत्रिकी विभाग** — अभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमांच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासंबंधी संबंधिताना सूचना द्यावी. तसेच, ध्वजस्तभांची स्वच्छता व वरील कप्पीची सुस्थिती पहावी. विद्यापीठ परीसरातील सर्व पुतळयांची देखभाल व स्वच्छता पहावी. तसेच पुतळयांना पुष्पहार अर्पण करणेकामी उद्यान विभागास आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून ध्यावी.
४. **अभियांत्रिकी विद्युत विभाग** — सदर कार्यक्रमांच्या अनुषंगाने आवश्यक तेथे ध्वनीक्षेपकाची, लाईट ची व्यवस्था करावी. तसेच वर्धापनदिनाच्या आदल्या दिवशी ध्वजारोहण ठिकाणी रांगोली काढणेसाठी लाईटची व्यवस्था करावी.
५. **सुरक्षा विभाग** — प्रमुखांनी ध्वजारोहणप्रसंगी ध्वज हाताळणीसाठी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी व परेडची व्यवस्था करावी.
६. **विद्यार्थी विकास विभाग**— सदर दिवशी प्रचलित पध्दतीने ध्वजारोहण कार्यक्रमाचे नियोजन करावे.
७. **संगीत अधिविभाग** — विभागप्रमुख, संगीत अधिविभाग यांनी ध्वजारोहन ठिकाणी व सदरच्या कार्यक्रमावेळी प्रचलीत पध्दतीने गायनाची व्यवस्था करावी.
८. **वाहन विभाग** — विभागप्रमुख, संगीत अधिविभाग यांचे सुचनेनुसार त्यांना वाहन उपलब्ध करून द्यावे.
९. **उद्यान विभाग** — सदर दिवशी विद्यापीठ परिसरातील सर्व पुतळयांना पुष्पहार अर्पण करण्याची कार्यवाही करावी. तसेच, कार्यक्रमाच्या ठिकाणी सजावट करावी.
१०. श्री डी. आर. चौगुले, श्री यु. बी. कांबळे, यांनी समारंभावेळी आवश्यक ती सर्व तयारी करणे (रेड कारपेट, मॅट अंथरणे व काढणे व इतर अनुषांगीक कामकाज)
११. **इंटरनेट विभाग**— सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

टीप— सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवकांच्या निदर्शनास आणून सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्याबद्दल सूचना द्यावी.